८. जर यशस्वी बोलीदाराने वरीलप्रमाणे बोली रकमेपैकी २५% रक्कम भरण्यात अपयश आले, तर त्याने/तिने/त्यांनी जमा केलेली इसारा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आणि विक्री रद्द मानली जाईल. त्याचप्रमाणे, लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत उर्वरित ७५% रक्कम भरण्यात बोलीदार अपयशी ठरल्यास, व्यवस्थापक २५% बोली रक्कम किंवा त्यानंतर जमा केलेली कोणतीही रक्कम जप्त करेल.
९. नोंदणी शुल्क, हस्तांतरण शुल्क, कर, देखभाल शुल्क तसेच वरील वाहनासंबंधी इतर सर्व खर्च यशस्वी बोलीदार/खरेदीदारानेच वहन करावेत.
१०. विक्री प्रमाणपत्र केवळ खरेदीदार/यशस्वी बोलीदार यांच्या नावानेच जारी करण्यात येईल आणि इतर कोणत्याही नावाने जारी करण्यात येणार नाही.
११. कोणतेही कारण न देता कोणतीही प्रस्ताव/बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच लिलाव पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा आणि पूर्वसूचना न देता विक्रीच्या अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार बँक अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
१२. इच्छुक बोलीदार निम्नस्वाक्षरीकार व्यवस्थापकांशी मोबाईल क्र. ९८२१६५१८००/ ९३२१७१३१४१ वर संपर्क साधू शकतात.
१३. कर्जदारास याद्वारे सूचित करण्यात येते की, लिलावाच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी संपूर्ण थकबाकी, शुल्क, प्रभार आणि खर्चाचा भरणा करून त्यांना तारणमत्ता मुक्त करण्याचा अधिकार आहे; अन्यथा सदर वाहनाचा लिलाव/विक्री करण्यात येईल आणि काही शिल्लक थकबाकी राहिल्यास ती व्याज आणि परिव्ययसह त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

सही/-
दिनेश एस. बोरसे
(व्यवस्थापक)
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.

ठिकाण : डोंबिवली
दिनांक : ०७/०७/२०२६

*उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.

कब्जा सूचना

एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन : यु६७१००एमएच२००७पीएलसी१७४७५९
रिटेल मध्यवर्ती आणि नोंद. कार्यालय : एडलवैस हाऊस, सीएसटी रोड लगत, कलिना, मुंबई ४०००९८

जोडपत्र IV (नियम-८(१)) कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी खालील नमुद तारण धनकों च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट), रुल्स २००२ चा (नियम ३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील नमूद मागणी सूचना जारी करून कर्जदारांना सदर सूचनांच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यासाठी आवाहन करत आहेत.

त्यानंतर, खालील नमुद अभिहस्तांककर्त्ये यांनी याखालील नमुद विविध **ट्रस्टचे** विश्वस्त म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत असलेल्या **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड** (यानंतर **ईएआरसी** असा उल्लेख) कडे खालील नमूद वित्तीय मत्ता अभिहस्तांकित केली आहे. सरफैसी ॲक्ट, २००२ चे कलम ५ अन्वये निष्पादित केलेल्या अभिहस्तांकन करारानुसार **ईएआरसी**, अभिहस्तांकनकर्त्याच्या जागी आले आणि वित्तीय मत्तासंबंधीचे अभिहस्तांकनकर्त्यांचे सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंध यासह कर्जदारांद्वारे घेतलेल्या वित्तीय सहाय्याचे संबंधी तारण हितसंबंध, हमी, ताबे गहाण **ईएआरसीकडे** निहित झाले आहेत आणि **ईएआरसी**, तारण धनको म्हणून त्यांच्या सर्व अधिकारांचा वापर करीत आहेत.

कर्जदारांनी रकमेची परतफेड करण्यात कसूर केली आहे, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडचे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने ॲक्टचे कलम १३ चे पोट-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ चा रुल ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक मिळकतीसमोर नमूद केलेल्या तारखे रोजीस खालील नमूद मिळकतीचा कब्जा घेतला आहे.

अ. क्र.	अभिहस्तांकनकर्त्यांचे नाव	ट्रस्टचे नाव	कर्ज खाते क्रमांक	कर्जदारांचे नाव आणि सह - कर्जदारांचे नाव	मागणी सूचनेची रक्कम आणि तारीख	कब्जाची तारीख	कब्जा स्थिती
१	पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड	ईएआरसी ट्रस्ट एससी -४८९	एचएफ/०२३५/एच/१९/१००१७८	१) अरविंद गोविंद नाक्का (कर्जदार/गहाणदार) २) ईश्वरीबाई गोविंद नाक्का श्र(सह-कर्जदार/गहाणदार)	रु. १९,८३,१२४.०१/- आणि ०८-०८-२०२४	०८.०७.२०२६	प्रत्यक्ष कब्जा

मिळकतीचे वर्णन: फ्लॅट क्र. ३०१ असलेली मिळकत, मोजमापीत क्षेत्र अंदाजे ६००.०० चौ. फूट म्हणजेच ५५.७६ चौ. मीटर (बांधकाम क्षेत्र), ३ रा मजला, ''जय माता दी कॉम्प्लेक्स'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये, ग्रामपंचायत घर क्र. ५६५ धारक, सर्व्हे क्र. ८८/२/२ आणि नवीन सर्व्हे क्र. ४/२/२ धारक जमिनीवर बांधलेली, गाव शेलार, शेलार ग्रामपंचायत हद्दीत, उप-नोंदणी जिल्हा आणि तालुका भिवंडी, नोंदणी जिल्हा आणि जिल्हा ठाणे, महाराष्ट्र राज्य, शहर : ठाणे, राज्य : महाराष्ट्र, पिन कोड : ४२१३०२ येथे स्थित असलेले व वसलेले ते सर्व भाग व विभाग.

तारणमत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध असलेल्या वेळेसंबंधी ॲक्टचे कलम १३ चे पोट-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. विशेषतः कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना मिळकतीशी व्यवहार न करण्याबाबत सावधान करण्यात येत आहे आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार खालील नमूद रक्कम आणि त्यावरील व्याजाकरिता **एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेडच्या** भाराअधीन राहील.

ठिकाण : महाराष्ट्र
दिनांक : १०-०७-२०२६

सही/- प्राधिकृत अधिकारी
एडलवैस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

Edelweiss Asset Reconstruction

सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लि. कार्यालय क्र. २०१-बी, २ रा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र.-बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम)-४००६०४

आयसीआयसीआय बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतींचा **सांकेतिक कब्जा** त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदारांचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/ सांकेतिक कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१.	सुभाजित गौर माणिक आणि रिना माणिक मोंडल एलबीजेएलएन०००००६१६७४३०	सीटीएस ३७३, टाऊन प्लॅनिंग स्कीम क्र. १, घर क्र. १७०, जुना जळगाव कोळी पेठ क्षेत्र, श्री राम मंदिर जवळ, महाराष्ट्र, जळगाव- ४२५००१/ जुलै ०६, २०२६	फेब्रुवारी २१, २०२६ रु. ४४,३३७/-	जळगाव
२.	मोहन तातू पाडवळ आणि सारिका मोहन पाडवळ एलबीएनएएस००००५६८३१५७	फ्लॅट क्र. १०४, बी-विंग, १ला मजला लक्ष्मी नारायण हाईट्स अपार्टमेंट सर्व्हे क्र. २९०/९, प्लॉट क्र. ८/९/१०/११ (सिटी सर्व्हे क्र. ६१०३/ए/४ ते ६१०३/ए/७) हरि विष्णू प्रोजेक्ट खांडेराव नागा, मौजे पाथर्डी, नाशिक-४२२००९/ जुलै ०६, २०२६	मार्च २४, २०२६ रु. ९,९०,०९०/-	नाशिक
३.	राजेंद्र पंढरीनाथ जोरवेकर आणि रिंकू राजेंद्र जोरवेकर टीबीएनएएस०००००६९६८६१७ आणि टीबीएनएएस०००००६९६८६१८	फ्लॅट क्र. ४०४, ४था मजला गंगाधारी अपार्टमेंट, पाथर्डी फाटा रोड शिवार, सर्व्हे क्र. ३२६/२/१४, प्लॅटिनम हॉस्पिटलमागे, ज्ञानेश्वर नगर, पाथर्डी फाटा, रेणुका नर्सिंग होम जवळ, नाशिक- ४२२०१०/ जुलै ०६, २०२६	मार्च १२, २०२६ रु. १८,६७,४६१/-	नाशिक

वरील नमूद कर्जदार/हमीदारांस याद्वारे ३० दिवसांत रकमेचा भरणा करण्यास सूचना देण्यात येत आहे. अन्यथा गहाण मिळकती सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीं अंतर्गत सदर सूचना प्रकाशनाच्या ३० दिवसांच्या समाप्तीनंतर विकण्यात येतील.

दिनांक : जुलै १०, २०२६
स्थळ : जळगाव व नाशिक

सादर प्राधिकृत अधिकारी,
आयसीआयसीआय बँक लि. करिता

सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम १२, १३ तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या इतर तरतुदी व नियमांनुसार आणि केंद्र शासन तसेच आवश्यक त्या इतर प्राधिकरणांच्या मंजुरीच्या अधीन राहून, कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यातून तामिळनाडू राज्यात (म्हणजेच कंपनी निबंधक, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रातून कंपनी निबंधक, चेन्नई यांच्या कार्यक्षेत्रात) स्थलांतरित करण्यासाठी कंपनीच्या **अधिनियमपत्रात (Memorandum of Association)** आवश्यक बदल करण्याचा प्रस्ताव आहे.

कंपनीचे सध्याचे नोंदणीकृत कार्यालय खालील पत्त्यावर आहे:
२०२, सीता नगर फेज II सीएचएस लिमिटेड, नवघर फाटक रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०११०५.
कंपनीचे प्रस्तावित नोंदणीकृत कार्यालय खालील पत्त्यावर असेल:
सी१-७०४, पूर्वा विंडरमिअर, भवानी अम्मन कोइल स्ट्रीट, सूर्या नगर, पल्लीकरणई, चेन्नई – ६००१००.

कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या प्रस्तावित स्थलांतरामुळे ज्यांच्या हितसंबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा कोणत्याही व्यक्तीने या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हितसंबंधाचे स्वरूप व हरकतीची कारणे नमूद करून शपथपत्रासह हरकत एमसीए पोर्टल (www.mca.gov.in) वर दाखल करावी किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे अथवा प्रत्यक्ष सुपूर्द करून प्रादेशिक संचालक यांच्याकडे सादर करावी. तसेच त्याची एक प्रत वरील नमूद कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

मेसर्स रीसर्चे सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातर्फे व त्यांच्या वतीने
स्वाक्षरी :
संचालकांचे नाव : **श्रीमती सोमलिंगा राममूर्ती श्यामला**

दिनांक : १० जुलै, २०२६
स्थळ : ठाणे

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

kotak

नोंद. कार्यालय : २७बीकेसी, सी२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पू), मुंबई- ४०० ०५१.
कॉर्पोरेट कार्यालय: कोटक इन्फिनिटी, बिल्डिंग क्र. २१, इन्फिनिटी पार्क, जनरल ए. के. वैद्य मार्ग, मालाड (पू), मुंबई - ४०० ०९७.
www.kotak.com

लिलाव - सूचना

खालील नमूद कर्जदारांनी खाली विनिर्दिष्ट केल्यानुसार सोने दागिने/वस्तु गहाण ठेवून सोने कर्ज सुविधा घेतली आहे. कर्जदारांनी हप्ते आणि थकबाकी रकमेची परतफेड करण्यास कसूर केलेली आहे आणि त्यामुळे बँकेला थकीत रकमांची परतफेड करण्यासाठी कर्जदारांना बोलाविण्याकरिता सूचना जारी करणे भाग पडले. तथापि, कर्जदार त्यांची उर्वरित थकबाकीची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्यामुळे बँकेच्या नावे तारण ठेवलेल्या सोने दागिन्यांचा लिलाव करणे बँकेला भाग पडत आहे.
वर वर्णन केलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा खुला लिलाव येथे करण्यात येईल :-

दिनांक: २०-०७-२०२६ वेळ: स. ११.०० वा. ठिकाण: संबंधित उप ठिकाणे/ई-लिलाव

एपीपी/एपीएसी	पक्षकाराचे नाव	राज्य	ठिकाण	शाखा	ढोबळ वजन
जीएलएन४४७३३६२	मनोज राजनारायण गुप्ता	महाराष्ट्र	मुंबई	कांदिवली	७०.००
जीएलएन४३९४१८०	प्रभाकर देवण्णा नायक	महाराष्ट्र	मुंबई	लोखंडवाला	१०.८६
जीएलएन४५२१०९६	रेहाना बानो इसरार अहमद खान	महाराष्ट्र	मुंबई	लोखंडवाला	१४३.२८
जीएलएन४३७८७८७	किरण आनंदा गावडे	महाराष्ट्र	मुंबई	लोखंडवाला	११.२४
जीएलएन४०९५२८४	आसिफ अशफाक खान	महाराष्ट्र	मुंबई	माहीम पश्चिम	५८.०५
जीएलएन४४३३०८१	दिनेशपुरी गोस्वामी	महाराष्ट्र	मुंबई	माहीम पश्चिम	१६८.८३
जीएलएन४२५१०९०	कदम वैशाली वसंत	महाराष्ट्र	मुंबई	मालाड	४२.४७
जीएलएन४२८५८५५	पटेल यशकुमार प्रशांतभाई	महाराष्ट्र	मुंबई	मालाड एस व्ही रोड	२४.९६
जीएलएन४००११०३	संतोषकुमार आर. यादव	महाराष्ट्र	मुंबई	एमईस्ट	७०.९३
जीएलएन४३९४९१०	सबा सय्यद	महाराष्ट्र	मुंबई	एमईस्ट	८२.४७
जीएलएन४४९७२१२	पटेल यशकुमार प्रशांतभाई	महाराष्ट्र	मुंबई	एमईस्ट	२०.१२
जीएलएन४४९७३०४	उदय इंद्रप्रकाश सिंह	महाराष्ट्र	मुंबई	मिरारोड	२७.०१
जीएलएन४५४४३३६	सागर कौशल जैस्वाल	महाराष्ट्र	मुंबई	मिरारोड	६४.५४
जीएलएन३८८८३०४	बेजंती लल्लन महतो	महाराष्ट्र	मुंबई	मिरारोड १	२१.१६
जीएलएन४४८९५२५	संजय भगवानदास भीमानी	महाराष्ट्र	मुंबई	मुमवडाला	९१.०२
जीएलएन४२३३७३४	शिप्रा अमोल रेडीज	महाराष्ट्र	मुंबई	मुमवडाला	११३.५६
जीएलएन४३७४८७५	योगिनी अर्जुन कदम	महाराष्ट्र	मुंबई	नालासोपारा	१३.१७
जीएलएन४३०१५१७	भूषण विठ्ठल पालव	महाराष्ट्र	मुंबई	सांताक्रूझ-ई	३०.९०
जीएलएन४४२४३४०	भूषण विठ्ठल पालव	महाराष्ट्र	मुंबई	सांताक्रूझ-ई	२६.८१
जीएलएन४४२४३३६	भूषण विठ्ठल पालव	महाराष्ट्र	मुंबई	सांताक्रूझ-ई	१८.९३
जीएलएन४५३३४१०	रशिकभाई हरिशंकर जोशी	महाराष्ट्र	मुंबई	वसई	९०.००
जीएलएन४२६४४६८	देहुल किरीट परमार	महाराष्ट्र	मुंबई	वसई	१६.७०
जीएलएन४५३८५३०	ज्योती रंजीत टूर	महाराष्ट्र	मुंबई	विक्रोळी	३३.८२
जीएलएन४४७३१०२	पार्थ पंकज दवे	महाराष्ट्र	मुंबई	विक्रोळी	५२.२९
जीएलएन४३१३११६	रिंकू मुरारी सिंग	महाराष्ट्र	मुंबई	विरार	४१.०३

बोलीदारांना त्यांचे मूळ छायांकित-ओळखपत्र, स्वाक्षरी आणि पत्त्याचा पुरावा त्यासह दोन सध्याचे फोटोग्राफ्स उप ठिकाणी सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे.
तसेच कागदपत्र हस्तांतरणासाठी वैयक्तीक बोलीदारांनी सुद्धा उपस्थित रहावे. बँक बोलीदारांस कोणतीही सूचना न देता लिलावाचे ठिकाण/तारीख/वेळ बदलण्याचे वा लिलाव रद्द/उच्चतम बोली अंतिम करण्याचे प्राधिकार राखून ठेवत आहेत. ग्राहकाच्या खात्यांमधून लिलावाच्या प्रक्रियेची रक्कम घेतली जाईल. बोलीची रक्कम खातेदाराच्या खात्यातील रकमेच्या आसपास नसल्यास सदर रक्कम ग्राहकाच्या बोलीतून घेण्याचे अधिकार बँकेकडे राखून ठेवले जातील.
लिलावाच्या अटी आणि शर्तींसंबंधी कोणत्याही पुढील तपशील/सहाय्य/स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही **श्री. सुशांत चव्हाण** ०९२२६२८८६२४ येथे संपर्क साधणे आवश्यक आहे.

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९, भारत
शाखा कार्यालय: १ला मजला, कार्यालय क्र. पीओ२/१४७, हार्मनी प्लाझा, एसबीआय समोर, बोईसर, जि.- पालघर- ४०१५०१
शाखा कार्यालय: २रा मजला, कार्यालय २०४, जंक्शन ४०६, प्लॉट क्र. ४०६/१बी, टक्का रोड, पनवेल पश्चिम ४१०२०६
शाखा कार्यालय: कार्यालय क्र. एफबी-७, एफबी-११७, एफबी-११८, एफबी-११९, १ला मजला, हायलॅण्ड कॉर्पोरेट सेंटर, कापूरबावडी जंक्शन, माजिवडे, ठाणे (प)- ४००६०७.

खाजगी कराराद्वारे स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(८) सहवाचता नियम ९(१) चे अन्वये खाजगी कराराद्वारे स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी खालील गहाण मिळकतीच्या विक्रीकरीता अनेक लिलाव घेतले, तरी ते सर्व ई-लिलाव अयशस्वी झाले. आता, एक इच्छुक खरेदीदार आयसीआयसीआय एचएफसीला राखीव किंमत (कृपया खालील तक्ता पहावा) च्या प्रस्तावासह संपर्क करावा. याद्वारे सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा कब्जा आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती खालील दिलेल्या संक्षिप्त तपशीलानुसार खाजगी कराराद्वारे ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/ कायदेशीर वारसदारांचे नावे/ कर्ज खाते क्र.	तारण मत्तेच्या तपशीलासह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलावाच्या तारखेच्या आधीच दिवस	सरफैसी टप्पा
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)	(एच)	(आय)
१.	शैलेंद्र सिंग (कर्जदार) अजय गिरीश ढोबळे (हमीदार) कर्ज खाते क्र. एलएचव्हीएसआय००००१४६६९७७ आणि एलएचव्हीएसआय००००१४६६९८२	फ्लॅट क्र. बी/४०६, चौथा मजला, इमारत क्र. ०२, परसनाथ टाऊनशिप, बोईसर रोड, उमरोली (पश्चिम), जि. पालघर ४०१४०४	रु. १३,१३,९३९/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ५,००,०००/- रु. ५०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२७ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२४ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
२.	अफरीन मुदस्सिर अखवारे (कर्जदार) मुदस्सिर हनीफ अखवारे (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचव्हीएसएच००००१३२८१६२	फ्लॅट क्र. ६०५, सहावा मजला, स्वराज हाईट्स, सेक्टर-३, करंजाडे, प्लॉट क्र. ६१, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२०६	रु. २७,९०,३७८/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. १०,००,०००/- रु. १,००,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	सांकेतिक कब्जा
३.	बाळू धोंडीराम पवार (कर्जदार) शांताबाई धोंडीराम पवार (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचयूएलएच००००१५०१०४६	फ्लॅट क्र. २०३ व २०४, दुसरा मजला, महादेव रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १८१, सेक्टर क्र. २४, वहाळ पुष्पक, नविन नोड, उळवे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०६	रु. ४६,२६,३६४/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. २०,००,०००/- रु. २,००,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
४.	आदित्यनाथ राजभर (कर्जदार) वंदना राजभर (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीव्हीएल००००१५२५३९५ आणि एलएचपीव्हीएल००००१५२५३९६	फ्लॅट क्र. २०८, दुसरा मजला, तन्वी अपार्टमेंट, घर क्र. २२८ व ३३२, गाव केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६	रु. २५,७१,१७४/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ६,००,०००/- रु. ६०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
५.	दिलशाद मुख्तार खान (कर्जदार) शेख मुमताज बाबू (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएमएमआर००००१५७०४४६ आणि एलएचएमएमआर००००१५७०४४७	फ्लॅट क्र. ४०४, चौथा मजला, एस. आर. रेसिडेन्सी, प्लॉट क्र. १८, सेक्टर-२०, तलोजा, पनवेल, रायगड ४१०२०८	रु. ३०,१७,२९९/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. १२,००,०००/- रु. १,२०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
६.	संजय जितेंद्र बिंद (कर्जदार) ललितादेवी जितेंद्र बिंद (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचव्हीएसएच००००१५९८३६४ आणि एलएचव्हीएसएच००००१५९८३६६	फ्लॅट क्र. २०२, दुसरा मजला, सी विंग, गुरु श्रद्धा बिल्डिंग, सर्व्हे क्र. ७४, मौजे गारपोली, भिवपुरी, ता. कर्जत, जि. रायगड, पिन कोड-४१०२०१	रु. ११,३४,३७२/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. २,५०,०००/- रु. २५,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
७.	मनीष हरिनाथ नगर (कर्जदार) शकुंतलादेवी हरिनाथ नगर (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचबीओव्ही००००१५५३३६१	फ्लॅट क्र. २०२, ए विंग, दुसरा मजला, विवियाना ब्लॉक-४, निसर्ग निर्माण, सर्व्हे क्र. ८७, प्लॉट क्र. ३८ व ४२, गाव धामोटे, ता. कर्जत, जि. रायगड-४१०१०१	रु. २१,९६,११०/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ७,००,०००/- रु. ७०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
८.	गुरुदास सिबाराम पंडा (कर्जदार) गुरुचरण एस. पंडा (हमीदार) कर्ज खाते क्र. एनएचएमयूएम०००००८२१३७७	फ्लॅट क्र. ००२, तळमजला, लव्ह बिल्डिंग क्र. ८, अयोध्या नगरी, सर्व्हे क्र. ५६, घर क्र. ६, दुबे बाग रोड, भारत कॉलेजच्या मागे, हेन्द्रपाडा, कुलगाव, बदलापूर (पश्चिम), ठाणे, महाराष्ट्र ४२१५०३	रु. १३,६५,२८४/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ७,००,०००/- रु. ७०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	सांकेतिक कब्जा
९.	सोनू सी. गुप्ता (कर्जदार) सुनीता सोनू गुप्ता (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचटीएनई००००१४०५०९२ आणि एलएचटीएनई००००१४०५०९३ आणि एलएचटीएनई००००१४१७७०२	फ्लॅट क्र. २, बी विंग, तळमजला, शिव शंभो व्हिला, सर्व्हे क्र. २६, हिस्सा क्र. ७/१, मौजे भाल, ता. अंबरनाथ, जि. ठाणे	रु. १६,९३,७०७/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. २,००,०००/- रु. २०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
१०.	विलास छगन बेंद्रे (कर्जदार) दिपाली विलास बेंद्रे (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीव्हीएल००००१५२६०७८ आणि एलएचपीव्हीएल००००१५२६०८२	फ्लॅट क्र. १०६, पहिला मजला, तन्वी अपार्टमेंट, घर क्र. २२८ आणि ३३२, गाव केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड	रु. २३,०८,८२०/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ६,००,०००/- रु. ६०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
११.	विशालकुमार भारती (कर्जदार) विनिता (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचव्हीएसएच००००१५१५१९५ आणि एलएचव्हीएसएच००००१५१५२४७	फ्लॅट क्र. २०७, दुसरा मजला, तन्वी अपार्टमेंट, केवाळे बस स्टॉपजवळ, घर क्र. २२८ व ३३२, गाव केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२०७	रु. १६,६६,४१३/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ४,००,०००/- रु. ४०,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा
१२.	सुनीता सचिन भोसले (कर्जदार) सचिन विठ्ठलराव भोसले (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचटीएनई००००१२८७०५३	प्लॉट क्र. २०, शैल वास्तू, वैशाखरे येथे, कल्याण नगर हायवे जवळ, मुरबाड, ठाणे, महाराष्ट्र ४२१४०१.	रु. २६,७३,३४४/- दिनांक ०६ जुलै, २०२६	रु. ३,५०,०००/- रु. ३५,०००/-	२० जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी ०३:००	२८ जुलै, २०२६ सकाळी ११:०० ते दुपारी १२:००	२७ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ०४:०० पूर्वी	प्रत्यक्ष कब्जा

ऑनलाईन लिलाव हा आमच्या लिलाव एजन्सी व्हॅल्यू ट्रस्ट कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडची वेबसाईट (**युआरएल लिंक-https://BidDeal.in**) वर करण्यात येईल. संभाव्य बोलीदारांनी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडकडे या मजकुराच्या वरील भागात वरील नमूद शाखा कार्यालय पत्त्यावर इसारा अनामत रक्कम (इअर) चा आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई मध्ये उल्लेखित) **जुलै २४, २०२६, जुलै २७, २०२६ किंवा पूर्वी सायं. ०४.०० पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. तसेच संभाव्य बोलीदारांनी या मजकुराच्या वरील भागात वरील नमूद शाखा कार्यालय पत्त्यावर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडकडे **जुलै २४, २०२६, जुलै २७, २०२६ किंवा पूर्वी सायं. ०५.०० पूर्वी** नोंदणी प्रपत्र आणि बोली अटी आणि शर्तींची सही केलेली एकप्रत सादर करायची आहे. इसारा अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) वरील नमूद ऑफिस पत्त्यावर येथे देय **''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव''** च्या नावे नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेकडील असणे आवश्यक आहे.
सामान्य जनतेला विनंती केली आहे की, त्यांनी वर नमूद केलेल्या इच्छुक खरेदीदाराने देऊ केलेल्या प्रस्ताव रकमेपेक्षा जास्त बोली सादर करावी. याद्वारे सूचित केले जाते की जर आयसीआयसीआय एचएफसीकडून वर नमूद केलेल्या इच्छुक खरेदीदाराने देऊ केलेल्या प्रस्ताव रकमेपेक्षा जास्त बोली न मिळाल्यास, गहाण ठेवलेली मालमत्ता उक्त इच्छुक खरेदीदारास सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२, नियम च्या नियम ८(८) सहवाचता नियम ९(१) नुसार विकली जाईल.
निरिक्षण, विक्रीच्या अटी आणि शर्ती किंवा बोली सादर करण्याच्या संदर्भातील पुढील कुठल्याही स्पष्टीकरणासाठी कृपया ९९२०८०७३०० वर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड किंवा व्हॅल्यू ट्रस्ट सेंट्रलाईज्ड हेल्पडेस्क क्र. ६२००-२२-६२०० यांना संपर्क करावा.
प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया **https://www.icicihfc.com** यावर भेट द्या.

दिनांक : जुलै १०, २०२६
ठिकाण : पालघर, रायगड, पनवेल, ठाणे

प्राधिकृत अधिकारी, ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड''
सीआयएन क्रमांक :- यु६५९२२एमएच१९९९पीएलसी१२०१०६

Utkarsh Small Finance Bank

Aapki Ummeed Ka Khaata
(A Scheduled Commercial Bank)

ज्या अर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट (सिक्युरिटी) इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ मधील नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३(२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद केलेल्या प्रत्येक खात्याच्या विरुद्ध नमूद केलेल्या दिनांकांना मागणी सूचना जारी करून, संबंधित सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत त्यामध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.
कर्जदारांनी सदर रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्यामुळे, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, त्यांनी रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे, खाली सही करणाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट (सिक्युरिटी) इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या कलम १३(४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली नमूद केलेल्या तारखांना सदर मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.
कर्जदारांना तसेच सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तांबाबतचा कोणताही व्यवहार युटीकेएआरएसएच स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या प्रभाराच्या अधीन राहील. तसेच खाली नमूद केल्याप्रमाणे देय असलेली रक्कम व त्यावरील व्याज यांच्याही अधीन राहील.
खाली नमूद केलेल्या कर्जदारांचे लक्ष याद्वारे सदर ॲक्टच्या कलम १३ मधील उपकलम (८) मधील तरतुदीकडे वेधण्यात येत आहे, ज्याअंतर्गत उपलब्ध असलेल्या मुदतीत सुरक्षित मालमत्तेची विमोचन करण्याचा त्यांना अधिकार आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव	खात्याचे नाव	कर्जदार/हमीदाराचे नाव (मिळकतीचे मालक)	मागणी सूचनेची तारीख	सांकेतिक कब्जा सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेरोजीस थकीत रक्कम
१	ठाणे महाराष्ट्र	१५५४०५००००००६०३५	मोहम्मद अब्बास बदानी (कर्जदार आणि गहाणदार) आणि इमरान अब्बास बदानी (सह-कर्जदार)	१६/०४/२०२६	०६/०७/२०२६ सांकेतिक	रु. ९६,३०,३७४.०९/-

गहाण/प्रभारित मिळकतीचे तपशील (मिळकत समाविष्ट चे ते सर्व भाग आणि विभाग): फ्लॅट क्र. ३४०२, ३४वा मजला, टॉवर क्र.०८, अथेना रनवाल एरिन, नारायण टेक्नो स्कुल जवळ, युनिव्हर्सिटी रोड, बाळकुम पाडा, गाव ढोकळी, ठाणे पश्चिम - ४००६०७.

अ. क्र.	शाखेचे नाव	खात्याचे नाव	कर्जदार/हमीदाराचे नाव (मिळकतीचे मालक)	मागणी सूचनेची तारीख	सांकेतिक कब्जा सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेरोजीस थकीत रक्कम
२	नाशिक	१५७००६००००००६१६९	सौ. रूपाली गणेश गिते (कर्जदार) आणि श्री. गणेश शिवनाथ गिते (सह-कर्जदार आणि गहाणदार)	१७/०४/२०२६	०८/०७/२०२६ सांकेतिक	रु. १०,४४,२२६.२९/-

गहाण/प्रभारित मिळकतीचे तपशील (मिळकत समाविष्ट चे ते सर्व भाग आणि विभाग): मिळकत क्र. ३७७/१, गाव मेंढी, वॉटर टँक जवळ, पिंपळगाव-मेंढी रोड, ता. सिन्नर, जिल्हा नाशिक-४२२१०३ चे ते सर्व भाग आणि विभाग., मिळकत सीमाबद्ध द्वारेः पूर्वः ग्रामपंचायत ओपन स्पेस, पश्चिमः रस्ता, उत्तरः श्री. प्रकाश निवृत्ती गिते यांची मिळकत (ओपन स्पेस), दक्षिणः रस्ता.

अ. क्र.	शाखेचे नाव	खात्याचे नाव	कर्जदार/हमीदाराचे नाव (मिळकतीचे मालक)	मागणी सूचनेची तारीख	सांकेतिक कब्जा सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेरोजीस थकीत रक्कम
३	नाशिक	१५७००६००००००६१२५	रत्नप्रभा शिवाजी चव्हाण (कर्जदार) आणि शिवाजी विश्वनाथ चव्हाण (सह-कर्जदार आणि गहाणदार)	१७/०४/२०२६	०८/०७/२०२६ सांकेतिक	रु. ७,६४,६५७.४२/-

गहाण/प्रभारित मिळकतीचे तपशील (मिळकत समाविष्ट चे ते सर्व भाग आणि विभाग): मिळकत क्र. २२१३, महादेव मंदीर मागे, पांडुरंग लॉन्स जवळ, चव्हाण वस्ती, निफाड-वनसगाव रोड, गाव उगाव, ता. निफाड, जिल्हा नाशिक-४२२३०४ चे ते सर्व भाग आणि विभाग., मिळकत सीमाबद्ध द्वारेः पूर्वः श्री. केशव खंडेराव चव्हाण यांची मिळकत, पश्चिमः श्री. गणपत खंडेराव चव्हाण यांची मिळकत, उत्तरः ग्रामपंचायत रस्ता, दक्षिणः गट क्र.१०२.

अ. क्र.	शाखेचे नाव	खात्याचे नाव	कर्जदार/हमीदाराचे नाव (मिळकतीचे मालक)	मागणी सूचनेची तारीख	सांकेतिक कब्जा सूचनेची तारीख	मागणी सूचनेच्या तारखेरोजीस थकीत रक्कम
४	बोरिवली (पश्चिम)	१५७९०५००००००६०७९	अब्दुल कादिर अन्वर खान (कर्जदार आणि गहाणदार) आणि आयशा अब्दुल कादिर खान (सह-कर्जदार आणि गहाणदार)	१७/०४/२०२६	०९/०७/२०२६ सांकेतिक	रु. २२,१८,१४६.७९/-

गहाण/प्रभारित मिळकतीचे तपशील (मिळकत समाविष्ट चे ते सर्व भाग आणि विभाग): फ्लॅट क्र.५०१, ५वा मजला, द्वारकानाथ हाइट्स, गुरूवली रोड, टिटवाळा गणेश मंदीर जवळ, नारायण नगर रोड, पर्डी क्र.१८, हिस्सा क्र.१, गाव टिटवाळा पूर्व, जिल्हा ठाणे ४२१६०५ चे ते सर्व भाग आणि विभाग.

दिनांक- १०/०७/२०२६, ठिकाण- महाराष्ट्र **प्राधिकृत अधिकारी, (शर्वणू दत्ता), उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लि.**

रिषभ इन्स्ट्रुमेंटस लिमिटेड

RISHABH
CIN: L31100MH1982PLC028406
रजि. कार्यालयः ए-५४, MIDC, MIDC बस डेपोच्या समोर, अंधेरी (पुर्व), मुंबई सिटी, मुंबई, महाराष्ट्र, इंडिया-४०००९३.
टेलिः +91 253 2202183 | ईमेलः cs@rishabh.co.in | वेबसाईटः https://rishabh.co.in

रिषभ इन्स्ट्रुमेंटस लिमिटेडच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची ("AGM") सूचना आणि ई-व्होटिंग माहिती

रिषभ इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेड (''कंपनी'') च्या सदस्यांची **४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("AGM") शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता (IST)** व्हिडीओ कॉन्फरन्स ("VC") / अन्य ऑडिओ व्हिज्युअल माध्यम ("OAVM") द्वारे आयोजित केली जाईल ज्यामध्ये, AGM च्या नोटीसमध्ये (सूचना) नमूद केलेले व्यवसाय पार पडतील. AGM ची कार्यवाही कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात होईल, जे AGM चे ठिकाण मानले जाईल.

१. कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत केलेले नियम, तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (Ministry of Corporate Affairs) यासंदर्भात जारी केलेली विविध परिपत्रके (जसे की सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०,१७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, २०/२०२० दिनांक ०५ मे २०२०, ०२/२०२१ दिनांक १३ जानेवारी २०२१, ०२/२०२२ दिनांक ०५ मे २०२२, १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२ आणि सर्वात अलीकडील सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५), तसेच सेबी (SEBI) चे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 दिनांक ५ जानेवारी २०२३ व यासंदर्भात सेबीने जारी केलेली इतर परिपत्रके आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमन, २०१५ (यात वेळोवेळी केलेले बदल, सुधारणा किंवा पुनरअमलबजावणीसह) यांच्या तरतुदींचे पालन करून; ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठीची सूचना आणि वार्षिक अहवाल ('वार्षिक अहवाल') केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अशा सदस्यांना पाठवण्यात आले आहेत ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणीकृत आहेत. सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यासोबतच, ते कंपनीच्या https://rishabh.co.in/ या संकेतस्थळावर, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) च्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर आणि संबंधित स्टॉक एक्स्चेंजच्या (म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड) www.bseindia.com व www.nseindia.com यासंकेतस्थळांवरही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

२. 'रिमोट ई-व्होटिंग' किंवा एजीएम (AGM) दरम्यान होणाऱ्या ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याच्या पात्रतेचे निर्धारण करण्यासाठी 'कट-ऑफ तारीख' (Cut-off date) ही **शुक्रवार, २४ जुलै २०२६** असेल. ज्या भागधारकांची नावे 'कट-ऑफ तारखेस' कंपनीच्या 'सदस्य नोंदवही मध्ये किंवा 'लाभार्थी मालकांच्या यादी' मध्ये समाविष्ट असतील, केवळ त्यांनाच सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावांवर 'रिमोट ई-व्होटिंग' किंवा एजीएम दरम्यानच्या ई-व्होटिंगद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याचा अधिकार असेल. ज्या व्यक्ती 'कट-ऑफ तारखेस' भागधारक नाहीत, त्यांनी या पत्रव्यवहाराकडे केवळ माहितीचा स्रोत म्हणून पहावे. भागधारकांचे मतदानाचे अधिकार हे 'कट-ऑफ तारखेस' कंपनीच्या 'भरणा झालेल्या इक्विटी भाग भांडवलातील' त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असतील.

३. सूचना पाठवल्यानंतर ज्या व्यक्तीने शेअर्स प्राप्त करून कंपनीचे सदस्यत्व मिळवले आहे आणि 'कट-ऑफ तारखेला' शेअर्स धारण केले आहेत, ती व्यक्ती कंपनीच्या किंवा (NSDL) च्या संकेतस्थळावर प्रदर्शित केलेल्या 'रिमोट ई-व्होटिंग' बाबतच्या सूचना पाहू शकते.

४. सर्व सदस्यांना सूचित करण्यात येते की:
(a) नोटीसमध्ये नमूद केलेले व्यवहार रिमोट ई-व्होटिंग किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेत (AGM) ई-व्होटिंगद्वारे पार पडू शकतात;
(b) रिमोट ई-व्होटिंगची कालावधी खालीलप्रमाणे आहे.

रिमोट ई-व्होटिंगची सुरूवातः	मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता (IST)
रिमोट ई-व्होटिंगची समाप्तीः	गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता (IST)

(c) गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजल्यानंतर रिमोट ई-व्होटिंग करता येणार नाही आणि वरील कालावधी समाप्त झाल्यानंतर NSDL कडून रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल अकार्यक्षम केले जाईल.
(d) AGM पूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मत व्यक्त केलेले शेअरहोल्डर AGM मध्ये VC/OAVM द्वारे उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क असणार नाही.
(e) AGM दरम्यान ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध असेल आणि AGM मध्ये VC/OAVM माध्यमातून उपस्थित असलेल्या अशा सदस्यांना, ज्यांनी संबंधित ठरावावर रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेले नाही आणि ज्यांना अन्य कोणत्याही कारणामुळे मतदानापासून वंचित करण्यात आलेले नाही, त्यांना AGM दरम्यान ई-व्होटिंगदद्वारे मतदान करण्याची परवानगी असेल.
(f) सदस्याने एका प्रस्तावावर एकदा मतदान केले की, नंतर त्या मतात बदल किंवा सुधारणा करण्याची परवानगी नाही.

५. ई-व्होटिंग आणि AGM मध्ये VC/OAVM द्वारे सहभागी होण्याची तपशीलवार प्रक्रिया नोटीसमध्ये प्रदान केलेली आहे. डिमॅट स्वरुपात शेअर्स धारण करणारे आणि ज्यांनी आपला ईमेल पत्ता नोंदणी केलेला नाही, अशा सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंग किंवा AGM मध्ये ई-व्होटिंगद्वारे मतदान कसे करावे, याची माहिती नोटिसमध्ये दिलेली आहे.

६. कोणतेही प्रश्न असल्यास, शेअरधारकांनी www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरील 'डाऊनलोड' विभागात उपलब्ध असलेल्या शेअरधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि 'ई-व्होटिंग वापरकर्ता' मार्गदर्शिका यांचा संदर्भ घ्यावा, किंवा ०२२ ४८८६ ७००० या क्रमांकावर कॉल करावा किंवा evoting@nsdl.com या ईमेलवर विनंती पाठवावी.
सर्व सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी नोटीस काळजीपुर्वक वाचावी आणि विशेषतः AGM मध्ये सहभागी होण्याच्या सूचनांवर तसेच रिमोट ई-व्होटिंग किंवा AGM दरम्यान ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याच्या प्रक्रियेवर लक्ष द्यावे.

रिषभ इन्स्ट्रुमेंटस लिमिटेडसाठी
सही/- अजिंक्य जोगळेकर
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यत्व क्रमांक A57272

तारीखः ०९ जुलै २०२६
स्थानः नाशिक

(टिपः स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

ARIS

एरिसिन्फ्रा सोल्युशन्स लिमिटेड

(यापूर्वी एरिसिन्फ्रा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)
नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. एओएफ, बी-०२ ते ०६, ४था मजला, बी-विंग, आर्ट गिल्ड हाउस, फिनिक्स मार्केट सिटी, एल.बी एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम), कुर्ला, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००७०.
सीआयएन: L51909MH2021PLC354997; **वेबसाईट:** www.aris.in; **इ-मेल:** cs@aris.in

पाचव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

कंपनीची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **शुक्रवार, दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता** (भा.प्र.वे.) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल (ओएव्हीएम) माध्यमाद्वारे एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्याचे अनुसूचित करण्यात आलेले आहे. सदर सूचना सभासदांना पाठविण्यात येईल.

हे 'कंपनी अधिनियम २०१३ च्या प्रयोज्य तरतुदी' आणि त्याअंतर्गत केलेले नियम आणि, 'सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सुचीबद्धता बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमावली, २०१५ (सेबी सुचीबद्धता विनियमावली) यांचे अनुपालन करून तसेच अन्य गोष्टींबरोबर कंपनी कामकाज मंत्रालयाने (एमसीए), दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजीचे सामान्य परिपत्रक क्र.०३/२०२५ त्याच प्रमाणे दिनांक ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२०, १३ जानेवरी, २०२१, ८ डिसेंबर २०२१, २८ डिसेंबर २०२२ आणि २५ सप्टेंबर २०२३ व १९ सप्टेंबर २०२४ रोजीची परिपत्रके (एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके' असा उल्लेख करण्यात आलेला आहे) यांचे पालन करून दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ रोजी किंवा त्या पूर्वी (व्हीसी) / (ओएव्हीएम) सुविधेद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा/विशेष सर्वसाधारण सभांचे आयोजन करण्यास परवानगी दिलेली आहे. सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या त्यांच्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/१६७ आणि दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३ ('सेबी परिपत्रके') अनुसार विशिष्ट तरतुदींचे पालन करून (सुचीबद्धता बंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमावली, २०१५ (सेबी सुचीबद्धता विनियमावली) यातील विशिष्ट तरतुदींचे पालन करण्याच्या संबंधात काही सवलती दिलेल्या आहेत. या परिपत्रकांचे तसेच अधिनियमाच्या तरतुदी तसेच सेबी सुचीबद्धता विनियमावली यांचे अनुपालन करून कंपनीची वार्षिक सर्व साधारण सभा (व्हीसी) / (ओएव्हीएम) सुविधेद्वारे एखाद्या सामाईक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय आयोजित करण्यात येत आहे.

एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांनुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीकडून, ज्या भागधारकांनी शुक्रवार, दिनांक ०३ जुलै, २०२६ अनुसार शेअर्स धारण केलेले आहेत आणि ज्यांनी आपापले ई-मेल पत्ते निबंधक आणि हस्तांतरण एजंट ('आरटीए') /निक्षेपस्थानीकडे नोंदणीकृत केले आहेत, अशा सभासदांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये पाठविण्यात आलेली आहे. तसेच सेबी सूचिबद्धता विनियमावली ३६(१)(ब) चे अनुपालन करून, कंपनीने शुक्रवार दिनांक ०३ जुलै, २०२६ अनुसार शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांना, ज्यांचे ईमेल पत्ते निबंधक आणि हस्तांतरण एजंट ('आरटीए') / निक्षेपस्थानीकडे नोंदणीकृत नाहीत, अशा भागधारकांना आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल, ज्यामध्ये एजीएमची सूचना समाविष्ट आहे, पाहण्यासाठी वेब लिंक असलेली पत्रे पाठवली आहेत.

सदर अधिनियमाची कलमे १०१ आणि १३६ तसेच त्या अंतर्गत तयार केलेली नियमावली यांच्या अनुषंगाने वार्षिक सर्वसाधारण सभेत हाताळल्या जाणाऱ्या सामान्य आणि विशेष कामकाजाचा तपशील देणारी सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी कंपनीचा वार्षिक अहवाल कंपनीच्या https://aris.in/pages/investor-relations-disclosures या संकेतस्थळावर आणि बीएसई लिमिटेडच्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तसेच एजीएम ची सूचना नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल'), जी यांच्या (व्हीसी) / (ओएव्हीएम) सुविधेसाठी आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदान करण्यासाठी तसेच एजीएम च्या दरम्यान दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदान (ई-मतदान) करण्यासाठी कंपनीद्वारे नियुक्त केलेली एजन्सी आहे, यांच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची आणि व्हीसी / ओएव्हीएम द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याची पद्धत:

अधिनियमाच्या कलम १०८ च्या तरतुदींनुसार आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ (सुधारित) च्या नियम २० अन्वये, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले सर्वसाधारण सभांवरील सचीवीय मानके आणि सुधारित सुचीबद्धता विनियमावली चा विनियम ४४ आणि एमसीए परिपत्रके यांच्या अनुषंगाने, कंपनी एजीएम चा कारभार पार पाडण्याच्या संबंधात आपल्या सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरवीत आहे आणि त्या उद्देशासाठी एनएसडीएल यांची इलेक्ट्रोनिक माध्यमाद्वारे मतदानाची सुविधा देण्या करिता नियुक्ती केलेली आहे आणि त्यानुसार एनएसडीएल कडून एजीएम पूर्वी दूरस्थ ई-मतदान पद्धतीचा तसेच एजीएमच्या दरम्यान दूरस्थ ई-मतदान पद्धतीचा वापर करून सभासदांना मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात येईल.

व्हीसी / ओएव्हीएम आणि ई- मतदानाद्वारे (ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत अशा भागधारकांच्या ई-मतदानासह) वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याची प्रक्रिया आणि पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये दिलेली आहे. ई- मतदान करण्यासाठी आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्यासाठी दूरस्थ ई- मतदान कालावधी आणि लॉगिन तपशील खालीलप्रमाणे आहेत:

इव्हीइएन	१४०११७
ई-मतदानासाठी पात्रता मोजण्याकरीता आणि वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याकरीता अंतिम तारीख	शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६
दूरस्थ ई- मतदानाचा प्रारंभ	मंगळवार दि. २८ जुलै, २०२६ रोजी (सकाळी ०९:०० वाजता भा.प्र.वे.)
दूरस्थ ई- मतदानाचा निकाल	गुरुवार, दि. ३० जुलै, २०२६ (संध्याकाळी ०५:०० वाजता भा.प्र.वे.)
वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड	वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये दिलेल्या सविस्तर प्रक्रिया आणि सूचना पहा.

टीप: वरील तारीख आणि वेळेनंतर दूरस्थ ई- मतदानाला परवानगी दिली जाणार नाही, कारण ते एनएसडीएलद्वारे अक्षम केले जाईल.

कट-ऑफ तारखेला, ज्या भागधारकांचे नाव सदस्यांच्या नोंदीमध्ये किंवा निक्षेपस्थानींनी राखलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदीमध्ये नोंदविण्यात आले आहे, त्यांनाच फक्त ई-मतदानाची सुविधा मिळू शकेल आणि वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहता येईल. **कट-ऑफ तारखेला भागधारक नसलेल्या व्यक्तीने ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी.** भागधारकाचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी शेअर भांडवलामध्ये असलेल्या त्याच्या भागधारकतेच्या प्रमाणात असतील. शुक्रवार, दिनांक ०३ जुलै,२०२६ नंतर कंपनीचा भागधारक बनलेल्या आणि कट-ऑफ तारखेला शेअर्स धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ई-मतदानाद्वारे आपला मतदानाचा अधिकार वापरता येईल आणि सूचनेत दिलेल्या सूचनांचे पालन करून वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहता येईल. आणि सूचनेत दिलेल्या सूचनांचे पालन करून लॉगिन आयडी आणि पासवर्ड देखील प्राप्त करता येतील/पुनर्प्राप्त करता येतील. ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना देखील ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदानाचे अधिकार वापरता येतील आणि सूचनेमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहता येईल.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहणाऱ्या, ज्या भागधारकांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही, त्यांना एजीएम दरम्यान त्यांचे मतदान करता येईल. ज्या भागधारकांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले आहे, त्यांना देखील एजीएमला उपस्थित राहता येईल. परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. जे भागधारक व्हीसी/ओएव्हीएम द्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असतील आणि ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही आणि अन्यथा त्यांना तसे करण्यास मनाई नाही, तेच भागधारक वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान उपलब्ध असलेल्या ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. जर एजीएम दरम्यान उपलब्ध असलेल्या ई-मतदानाद्वारे भागधारकांनी कोणतेही मत दिले असेल आणि जर त्याच भागधारकांनी व्हीसी द्वारे एजीएममध्ये भाग घेतला नसेल, तर अशा भागधारकांनी दिलेली मते विचारात घेतली जातील. एकदा का भागधारकाने ठरावावर मतदान केले की, भागधारकाला नंतर त्यात बदल करण्याची परवानगी राहणार नाही.

संचालक मंडळाने कंपनीच्या सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेची तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान दूरस्थ ई-मतदानाची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्याची सुविधा प्रदान करण्यासाठी, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव, ध्रुमिळ एम. शाह अँड कंपनी एलएलपी यांची छाननीकार म्हणून नियुक्ती केली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहण्याबाबत आणि ई-मतदानाशी संबंधित सर्व शंका/तक्रारी यासाठी सुश्री पल्लवी म्हात्रे, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, वांद्रे (पूर्व), मुंबई, ३०१, तिसरा मजला, नमन चेंबर्स, प्लॉट सी-३२, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५१ येथे किंवा evoting@nsdl.com वर किंवा ०२२-४८८६ ७००० वर संपर्क साधावा.

ई-मेल पत्त्याची नोंदणी:

सर्व सदस्यांना त्यांचे ई-मेल आयडी नोंदणीकृत करण्याची विनंती करण्यात येत आहे. कंपनीच्या, ज्या सदस्यांनी त्यांचा ईमेल पत्ता त्यांच्या निक्षेपस्थानी भागिदारांकडे नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते, ज्या निक्षेपस्थानी भागिदारांकडे ते त्यांचे डीमॅट खाते चालवतात, त्यांच्याकडे नोंदणीकृत/अद्ययावत करावेत.

एरिसिन्फ्रा सोल्युशन्स लिमिटेडकरीता
पूर्वी एरिसिन्फ्रा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली
सही/-
लतेश शैलेश शाह
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यत्व क्रमांक: एफ१२५५९

दिनांक: ०९ जुलै, २०२६
ठिकाण: मुंबई